प्रकरण पाचवे

# नागरीकरण

## (Urbanization)

**प्रस्तावना :-** (Introduction)

गेल्या काही दशकात लोकसंख्यावाढीबरोबरच ग्रामीण क्षेत्रातून नागरीक्षेत्राकडे लोकांच्या स्थलांतरात वाढ झाली आहे. त्यामुळे भारतात नगरांची संख्या दिवसेंदिवस वाढतच आहे. भारतात १९७१ साली नागरी लोकसंख्या १०.९१ कोटी, १९८१ साली १६.०१ कोटी आणि १९९१ साली २१.७ कोटी होती. म्हणजे २० वर्षात नागरी लोकसंख्येत जवळपास दुप्पट वाढ झाली. १९२१ साली नागरी लोकसंख्या एकूण लोकसंख्येच्या ११.३% होती ती वाढून १९५१ मध्ये १७.६% झाली. पुढे १९७१ साली २०.२%,१९८१ साली २३.८% आणि १९९१ साली २५.७% झाली आहे. १९११-२१ या दशकात शहरी लोकसंख्या ८.३%,१९२१-३१ मध्ये १९.१%,१९३१-४१ मध्ये ३२.०%, १९४१-५१ मध्ये ४१.४ %, १९५१-६१ मध्ये ३७.०% १९६१-७१ मध्ये ३८.२%,१९७१-८१मध्ये ३५.४ आणि १९८१-९१ या दशकात ४०.४% वाढली. अशा प्रकारे १९४१ ते १९९१ या पन्नास वर्षात नागरी लोकसंख्या वाढीचा दर ३.४% आणि ३.८% च्या मध्ये प्रतिवर्षी होता.

जगातील एकूण लोकसंख्येपैकी ४५% लोकसंख्या शहरात राहते. भारतात याचे प्रमाण २५.७% आहे. जगात सर्वात अधिक नागरी लोकसंख्या ऑस्ट्रेलिया आणि न्यूझिलंडमध्ये ८५% पाहावयास मिळते. भारतात १९९१च्या जनगणनेप्रमाणे नगरांची एकूण संख्या ४६८९ होती. (१९६१ च्या जनगणनेप्रमाणे नगराची व्याख्या केली आहे आणि आजही तीच व्याख्या लागू आहे) त्यांपैकी एकट्या महाराष्ट्रात ३०७ नगरे होती. ज्याप्रमाणे दिवसेंदिवस नगरांच्या संख्येत वाढ होत आहे त्याच प्रमाणे नगरातील प्रश्नांची संख्याही वाढत आहे. तसेच बेकारी, गुन्हेगारी, मादक वस्तूंचे सेवन, प्रदूषण आणि गलिच्छ वस्त्या यांनी उग्र रूप धारण केले आहे. सरकार हे प्रश्न सोडविण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. परंतु अद्याप याबर ठोस उपाय सापडला नाही. मात्र केंद्र सरकार, राज्यसरकार आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांनी नागरी प्रश्न सोडविण्याचे मनापासून प्रयत्न केले तर निश्चितच या समस्या सोडविता येतील व स्थानिक लोकांत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्त्व वाढेल.



**नगर -**
**(Urban)**

नगर हा शब्द सर्वत्र प्रचलित आहे. ह्या शब्दाच्या उच्चाराबरोबरच नगराची काही वैशिष्ट्ये आपल्या डोळ्यासमोर उभी राहतात. नगर या शब्दाचा वापर व्यवहारात दोन अर्थांनी केला जातो. त्यापैकी एक लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून आणि दुसरा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून. पहिल्या स्वरूपाच्या अर्थात लोकसंख्येचा आकार आणि लोकसंख्येची घनता या बाबींना प्राधान्य दिले जाते तर दुसऱ्या प्रकारच्या अर्थानुसार विषमता, अवैयक्तिकता आणि अन्योन्याश्रयता या बाबींवर लक्ष केंद्रित केले जाते. पहिल्या स्वरूपाच्या अर्थानुसार १९६१ च्या जनगणनेप्रमाणे नगराची व्याख्या करण्यात आली. त्यात नगरासाठी काही मापदंड बनविण्यात आले की जे मापदंड आजही त्याच स्वरूपात आहेत. १९६१ साली नगराकरिता पुढील मापदंड ठरविण्यात आले.

१) त्या स्थानाची कमीत कमी लोकसंख्या ५ हजार असावी.
२) प्रतिवर्ग मैलास १हजार लोकसंख्येचे घनत्व असावे.
३) त्या लोकसंख्येपैकी तीन-चतुर्थांश लोक बिगर कृषी व्यवसाय करणारे असावेत.
४) त्या स्थानाची स्वत:ची विशेषत: असावी.
५) रहदारी व दळणवळण, बँका, शाळा, बाजार, मनोरंजन केंद्रे, दवाखाने, वीज आणि वर्तमानपत्रे इ. नागरी सुखसुविधा असाव्यात.

आता नगरांचे वर्गीकरण लोकसंख्येस आधार मानून पुढीलप्रमाणे केले जाते. ज्या गावाची लोकसंख्या ५हजार ते २० हजारादरम्यान आहे अशा गावांना लहान नगर (Small Town) असे मानले जाते. ज्या गावाची २० हजार ते ५० हजारादरम्यान लोकसंख्या आहे अशा गावांना मोठे नगर (Large Town) मानले जाते. ज्या गावाची लोकसंख्या ५० हजार ते १लाखादरम्यान असते त्यास शहर (City) मानले जाते. ज्या शहराची लोकसंख्या १लाख ते १० लाख दरम्यान आहे अशा शहरास मोठे (Large City) शहर मानले जाते. १० लाख ते ५० लाखादरम्यान लोकसंख्या असणाऱ्या शहरास विशाल नगर (Metro Politan Cit- ies) असे म्हटले जाते. आणि ज्या शहराची लोकसंख्या ५० लाखांपेक्षा अधिक असते त्या शहरास महानगर (Mega City) म्हटले जाते.

परंतु समाजशास्त्रज्ञ नगराची व्याख्या करीत असताना लोकसंख्येस अधिक महत्त्व देत नाहीत. त्यांच्या मते नगरासाठी कमीत कमी लोकसंख्येचा निकष हा नेहमी बदलत असतो. शिवाय जगातील अन्य देशात हा निकष वेगळाही असू शकतो. म्हणून ते नगराची व्याख्या करीत असताना लोकसंख्या विचारात घेत नाहीत.

**नागरीकरण म्हणजे काय ? -**
**(What is Urbanization)**

लोकांचे ग्रामीण क्षेत्रातून नागरी क्षेत्रात स्थलांतर होणे म्हणजे नागरीकरण होय असे

नागरीकरणाबाबत म्हटले जाते. म्हणजेच वाढणारी लोकसंख्या ग्रामीण भागात न राहता
नागरी भागात राहत असते. थॉमसन वारन - (Encyclopedia of Social Sciences)
यांनी नागरीकरणाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. त्यांच्या मते, ''नागरीकरण म्हणजे
लोकांचा शेती व्यवसायातून दुसऱ्या व्यवसायात जाण्याचा प्रयत्न असतो. यामुळे जो समुदाय
निर्माण होतो तो साधारणत: मोठा असून त्याचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने व्यापार, उद्योग व शासकीय
स्वरूपाचे असते.'' तसेच नागरीकरणासंबंधी एन्डर्सन यांनी पुढील मत व्यक्त केले. त्यांच्या
मते, नागरीकरण एकतर्फी प्रक्रिया नसून दुतर्फी प्रक्रिया आहे. यामध्ये केवळ ग्रामीण क्षेत्रातून
नागरी क्षेत्रात स्थलांतरित होणे असे नाही तर प्रवाशांच्या दृष्टिकोनात, विश्वासात, मूल्यात
आणि व्यवहारातील स्वरूपात बदल होणे असा आहे. एन्डर्सन यांनी नागरीकरणाची पाच
वैशिष्ट्ये सांगितली आहेत. ती म्हणजे मुद्रा अर्थव्यवस्था, शासकीय प्रशासन, सांस्कृतिक
परिवर्तन, लिखित अभिलेख आणि अभिनव परिवर्तन होत.

वरील दोनही व्याख्यांचा परामर्श घेतल्यास नागरीकरण म्हणजे काय याची कल्पना स्पष्ट होते.

**नागरीकरणाची कारणे -**

(Causes of Urbanization)

गेल्या काही वर्षापासून नागरीकरणाची प्रक्रिया जगातील सर्व देशात सुरू झाली आहे याला भारतसुद्धा अपवाद नाही. समाजातील लोकांच्या भौतिक साधने व सुखसोयी याबाबतच्या कल्पना लक्षात घेतल्या तर नागरीकरणाची प्रक्रिया भविष्यातसुद्धा अशीच चालू राहील असे वाटते. अशा नागरीकरणास भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात पुढील प्रकारची कारणे जबाबदार असल्याचे पाहावयास मिळतात.

**१) उद्योगीकरण -** नागरीकरणाचे पहिले कारण म्हणजे उद्योगीकरण होय. औद्योगिक क्रांतीमुळे नवनवीन उद्योगांची निर्मिती करण्यात आली. उद्योगामुळे ग्रामीण भागातील समाज नोकरीसाठी उद्योगाच्या ठिकाणी येऊ लागला. पर्यायाने त्या ठिकाणी अधिक लोकसंख्या वाढू लागली. अशा मानवी शक्तीचा वापर करण्यासाठी अनेक नवीन कारखाने वाढू लागले आणि यातूनच अनेक शहरे अवाढव्य बनू लागली. उदा.मुंबई, भिलाई, कलकत्ता, इत्यादी

**२) हरितक्रांती -** नागरीकरणाचा दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे कृषिक्षेत्रातील क्रांती होय. अलीकडच्या काळात कृषिउत्पादनात वाढ करण्यासाठी सुधारित पद्धतीने शेती करण्यात येऊ लागली. शेतीस व्यापारी तत्त्वावरील एक व्यवसाय असे स्वरूप प्राप्त झाले. शेतीसाठी लागणारी हत्यारे, औजारे व यंत्रे तयार होऊ लागली. संकरित बी-बियाण्यांचा वापर करण्यात येऊ लागला. रासायनिक खतांची त्यास जोड मिळाली. त्याचा परिणाम असा झाला की शेतीत विक्रमी उत्पादन होऊ लागले. शेतीसाठी सुधारित अवजारांच्या वापरामुळे शेतमजूर मोठ्या प्रमाणावर बेकार होऊ लागले. हे मजूर आपल्या उदरनिर्वाहासाठी गाव सोडून शहराचा रस्ता धरू लागले. परिणामी शहरांची वाढ झपाट्याने होऊ लागली.



**३) ग्रामीण लोकसंख्येचे स्थलांतर -** नागरीकरणाचा तिसरा महत्त्वपूर्ण घटक म्हणजे ग्रामीण क्षेत्रातून शहरी क्षेत्राकडे होणारे लोकसंख्येचे स्थलांतर होय. असे स्थलांतर होण्याचे कारण म्हणजे ग्रामीण भागात असलेली बेरोजगारी, जीवनासाठी असलेल्या किमान सुविधांचा अभाव आणि आर्थिक व सामाजिक विषमता यामुळे ग्रामीण भागातील लोक शहराची वाट धरतात.

**४) व्यापारी क्रांती -** हाही नागरीकरणाच्या वाढीस प्रेरणा देणारा घटक आहे. ज्या ठिकाणी व्यापारी क्रांती झालेली असते म्हणजे जेथे व्यापार-व्यवसाय, दळणवळणाच्या सुविधा असतात तेथे मोठी दुकाने, बाजारपेठा, राहत्या घरांच्या वसाहती, शिक्षण, विश्रांतिगृहे इ. सोयी असतात. या सर्व सोयी नगरासाठी मूलभूत घटक असतात.

**५) दळणवळण व वाहतुकीच्या साधनातील वाढ -** शहरांच्या विकासासाठी दळणवळणाच्या सोई आणि वाहतुकीची साधने महत्त्वाची भूमिका बजावतात. ज्या शहरात दळणवळणाच्या सुविधा आहेत, उदा.पोस्ट ऑफीस, तार, दूरध्वनी इ. तसेच ज्या ठिकाणी वाहतुकीची साधने आहेत त्या ठिकाणी व्यापाऱ्यांना व्यापार करणे सोईस्कर ठरते. त्यामुळे अनेक व्यापारी व्यापारासाठी तेथे एकत्र जमतात. तसेच जवळच्या परिसरातील कामगार कामासाठी शहरात ये जा करू शकतात. अशा शहराचा विकास जलद गतीने होतो. उदा.मुंबई, कलकत्ता, मद्रास, इत्यादी.

**६) राजकीय कारणे-** काही शहरांचा विकास राजकीय कारणामुळे सुद्धा जलद गतीने होतो. उदा.राजधानीची शहरे तसेच राजाश्रय प्राप्त झाल्यामुळे सुद्धा शहराचा विकास होत असतो. उदा. चंदिगड. चंदिगड काही वर्षांपूर्वी खेडे होते; परंतु जेव्हा चंदिगडला पंजाबची राजधानी करावयाचे निश्चित झाले तेव्हा चंदिगडची खूपच वाढ झाली. या व्यतिरिक्त एखाद्या शहराचा विकास राजकीय नेत्यांच्या आश्रयामुळे सुद्धा होतो. महात्मा गांधीच्या सेवाग्राम येथील वास्तव्यामुळे वर्धा शहराचा झपाट्याने विकास झाला.

**७) शैक्षणिक केंद्रे -** शैक्षणिक सुविधासुद्धा शहराच्या विकासासाठी कारणीभूत ठरू शकतात. एखाद्या शहरात उच्च शिक्षणाचे केंद्र स्थापन झाले तर त्या शहराचा विकास जलद गतीने होतो. कारण विविध ठिकाणाहून विद्यार्थी व शिक्षक त्या ठिकाणी एकत्र होतात. अशा एकत्र झालेल्या विद्यार्थी आणि शिक्षकांना व्यावसायिक दृष्टिकोणातून का होईना विविध सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनेकजण तेथे येतात आणि परिणामी त्यामुळे शहरांची वाढ होते.

**८) धार्मिक स्थळे -** नगरांच्या विकासाचे आणखी एक कारण म्हणजे धार्मिक स्थाने होत. भारतात हिंदू, मुसलमान, बौद्ध इ. धर्मांची पवित्र क्षेत्रे शहर म्हणून विकसित झाली आहेत. उदा. वाराणशी, अमृतसर, नागपूर, आग्रा, इ.

**९) शहर सुधारणा व मनोरंजन -** ज्या शहरात व्यक्ती आणि समाज यांच्या विकासासाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा प्राप्त होतात, अशा शहरांचा विकास अतिशय जलदगतीने

होते. शहरात सिनेमा, नृत्य, संगीत, नाटक, हॉटेल्स, लोकांचे क्लब, वाचनालये, इत्यादींचा लाभ मिळू शकतो. असा लाभ खेड्यात मिळणे अशक्य असते. म्हणून खेड्यातून लोक आपल्या अंगी असलेल्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शहरात येतात. यामुळे शहरांची वाढ होते.

१०) अन्य कारणे - शहरांच्या विकासासाठी वरील कारणांशिवाय अन्य कारणेसुद्धा कारणीभूत ठरतात. या अन्य कारणात उदा. धर्मस्थाने, विश्वविद्यालये, वृत्तपत्रांची घरे, सैनिकी प्रशिक्षण केंद्रे, इ. चा यात समावेश होतो.

नागरीकरणाचे परिणाम -

(Effects of Urbanization)

औद्योगिकरण आणि अन्य कारणामुळे शहरांची वाढ अतिशय जलद गतीने होत आहे. आर्थिक क्षेत्रातही परिवर्तन झाले आहे आणि याचा परिणाम ग्रामीण जीवनाच्या विविध भागांवर झाला आहे. ग्रामीण जीवन हळूहळू बदलले आहे. ग्रामीण भागातील व्यक्तींचे विचार, भाषा, सवयी आणि वेशभूषा यांच्यात फरक पडला. ग्रामीण क्षेत्रातील गृहरचनेतही सुधारणा होऊ लागल्या. त्यांनी पारंपरिक मातीची घरे बांधणे सोडून आधुनिक पद्धतीच्या घरांसाठी सिमेंटचा वापर सुरू केला आहे. आता ग्रामीण क्षेत्रातही पक्के रस्ते, बसेस, मोटारी सुरू झाल्या आहेत. रेडिओ, दूरदर्शन आणि वर्तमानपत्रे यांच्यामुळे नवीन ज्ञानाची माहिती ग्रामीण क्षेत्रातील लोकांना घरी बसल्या देत आहेत. ग्रामीण भागातील लोकांना शहरातील वेशभूषेचे भूषण वाटली आहे. आज खेड्यात पॅन्ट वापरणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात दिसत आहे. नऊवार पातळ नेसणाऱ्या स्त्रियांची संख्या मर्यादित झाली आहे. स्त्रियांच्या साजशृंगारात वाढ झाली आहे. ग्रामीण क्षेत्रात पावडर आणि क्रीम सौंदर्य प्रसाधनांच्या साधनांचा सर्रास वापर सुरू झाला आहे. त्याचप्रमाणे गावातील दुकानदारांनी आपल्या दुकानात इलेक्ट्रिक वस्तू विकण्यास सुरुवात केली आहे.

नागरीकरणाच्या परिणामामुळे गावातील पारंपरिक करमणुकीची साधने बंद झाली आणि त्यांची जागा आता रेडिओ, दूरदर्शन, नाटके आणि व्हि.डी.ओ.नी घेतली. गावात आता भजने, कीर्तने बंद झाल्यासारखेच आहेत. धार्मिक श्रद्धेचे उच्चाटन होत आहे. शास्त्रीय प्रगतीमुळे अंधश्रद्धा, रूढी नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. शेतकरी सुद्धा पारंपरिक शेती करण्याचे सोडून आधुनिक पद्धतीने शेती करीत आहेत. शेतीसाठी सुधारित बी-बियाणे, रासायनिक खते आणि कीटकनाशके यांचा वापर करीत आहेत. तसेच शेतीच्या मशागतीसाठी शास्त्रीय पद्धतीच्या अवजारांचा उपयोग करीत आहेत. आजारांसाठी गावातील गावठी औषधी वापरणे बंद करून ॲलोपॅथिक औषधांचा वापर करीत आहेत. म्हणून आपणास असे म्हणता येते की, नागरीकरणामुळे ग्रामीण जीवनात आमूलाग्र परिवर्तन झाले आहे.

ग्रामीण भागातून शहराकडे येणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे शहरे अशा सर्वांना रोजगार उपलब्ध करून देण्यास असमर्थ आहेत. तर ग्रामीण भागातील



अनेक शेतमजूर कामासाठी शहरात येत्यामुळे इकडे ग्रामीण भागात शेतीसाठी शेतमजुरांची समस्या निर्माण होत आहे. शहरात सर्वांना काम मिळत नसल्यामुळे बेकारीत वाढ होत आहे. म्हणूनच चोरी करणे, जुगार खेळणे, विविध व्यसनांच्या आहारी जाणे, इ. प्रकार शहरात नित्याचेच पाहावयास मिळत आहेत. सामाजिक स्वास्थ्य बिघडत चालले आहे आणि म्हणूनच शहरात दिवसेंदिवस शांतता आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गहन होत चालला आहे.

नागरीकरणामुळे कुटुंबरचनेतसुद्धा परिवर्तन होत चालले आहे. शहरात पूर्वीच्या संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास होत आहे आणि त्याऐवजी आता वैयक्तिक कुटुंबपद्धती रूढ होत आहे. वैयक्तिक कुटुंबपद्धतीमुळे समाजापुढे विधवा, निराधार, वृद्ध आणि अपंगांच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. समाजातील सदस्यांबद्दल प्रेम, जिव्हाळा, सहानुभूती आणि आपलेपणा लोप पावत चालला आहे. व्यक्तींच्या जीवनात कुटुंबापेक्षा बाहेरच्या समूहाचे महत्त्व वाढत गेल्याने कुटुंबाचे व्यक्तीवरील नियंत्रण कमी होत आहे. सामाजिक जीवनात रूढींची पकड नष्ट होत चालली आहे. सामाजिक नियंत्रणात शिथिलता निर्माण होत चालली आहे.

नागरीकरणाचा परिणाम शहरातील सार्वजनिक आरोग्यावरही होत आहे. शहरात येणाऱ्यांची संख्या भरमसाठ वाढत आहे. अशा येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला सर्व सोयींनी युक्त घर मिळतेच असे नाही. तेव्हा अशा लोकांना राहण्यासाठी गलिच्छ वस्त्यांची मदत घ्यावी लागते. गलिच्छ वस्तीत आरोग्यास घातक असे वातावरण असते. अस्वच्छतेची व्यवस्था नसते. रस्त्यांकडे सांडपाण्याचे पाणी साचलेले असते आणि अशा साचलेल्या पाण्यामुळे अनेक रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. गलिच्छ वस्त्यातील अशा समस्या सोडविण्यास नगरपालिकासुद्धा नेहमीच असमर्थ असते. कारण त्यांच्याकडे पुरेसा निधी नसतो. प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची कमतरता असते आणि म्हणून या सर्व बाबींमुळे गलिच्छ वस्त्यातील लोकांचे आरोग्य धोक्यात येते.

नागरीकरणाचा आणखी एक परिणाम म्हणजे शहरात दिवसेंदिवस होणारी विकृत करमणुकीची वाढ होय. शहरात सर्व जाती आणि धर्मांच्या लोकांसाठी एकाच प्रकारचे करमणुकीचे साधन असते. सिनेमा अलीकडच्या काळातील दूरदर्शन यांच्याद्वारे तर व्यक्ती आणि समाज यांवर अतिशय दुष्परिणाम होत आहे. म्हणूनच समाजास घातक असे विचार करमणुकीच्या माध्यमातून प्रसारित होत नाहीत.

नागरीकरणामुळे महिलांना सुद्धा उन्नतीच्या संधी प्राप्त झाली आहे. ग्रामीण भागातील महिलांच्या तुलनेत शहरी भागातील महिला अधिक जागृत असतात. त्यांना आपल्या आर्थिक, राजकीय आणि सामाजिक अधिकारांची जाणीव असते. याचा उपयोग त्या आपला अन्याय आणि शोषण यापासून बचाव करण्यासाठी उपयोग करीत असतात. तसेच त्या पुरुषांच्या बरोबरीने अर्थोत्पादनही करतात. परंतु शहरात महिला नोकरी करू लागल्यामुळे त्यांचे आपल्या अपत्यांकडे दुर्लक्ष होऊन मुले उच्छृंखल होण्याचे प्रमाण वाढत आहे.

वरील नागरीकरणाच्या परिणामाचा विचार केल्यास असे म्हणता येते की, नागरीकरणाने मानव जातीचे कल्याण केले आहे. शिक्षणाचा प्रसार वाढत आहे. विज्ञानाच्या प्रगतीने

होत आहे. जुन्या कर्मठ रूढींना मूठमाती दिली जात आहे. जातीयतेचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे. म्हणून वरील बाबी ह्या नागरीकरणाची देण आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही परंतु नागरीकरणाचे जेवढे फायदे आहेत त्याहून जास्त तोटे आहेत. नागरीकरणामुळे माणूस माणुसकी विसरत चालला आहे. मानवी जीवनास यंत्राचे स्वरूप प्राप्त झाले आहे. समाजातील ऐक्याची भावना लोप पावत चालली आहे. नैतिक मूल्यात घट होत चालली आहे. सगळीकडे घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे. म्हणून नागरीकरणामुळे अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

### नागरीकरणाच्या समस्या -
(Problems of Urbanization)

ग्रामीण भागातून शहरांकडे येणाऱ्यांचा लोंढा दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यामुळे शहरांची अतिशय जलद वाढ होत आहे. शहरांच्या वाढीबरोबरच शहरात अनेक समस्या निर्माण होत आहेत. त्यांपैकी कुटुंब संस्थेत विस्कळीतपणा येणे, शेजाऱ्याबाबत उदासीनता, कृत्रिम संबंध, संकुचित वृत्तीत वाढ अशा अनेक समस्या निर्माण झालेल्या आढळून येतात. याशिवाय शहरापुढे पुढील काही अन्य समस्या दिसून येतात.

#### १) गृहनिर्माण आणि गलिच्छ वस्त्या -

नागरीकरणामुळे निर्माण होणारी सर्वात गहन समस्या म्हणजे घरांची टंचाई आणि गलिच्छ वस्त्याही होय. नगरातील ही समस्या दूर करणे अतिशय अवघड काय आहे. कारण यू.एन.आय.च्या एका अहवालानुसार भारतात मोठ्या शहरातील एक चतुर्थांशपेक्षाही अधिक लोक कामचलाऊ किंवा गलिच्छ वस्त्यात राहतात. देशातील एकूण कुटुंबांपैकी १५% कुटुंबे बेघर आहेत. ६०% घरांत पर्याप्त प्रमाणात प्रकाश व हवा नसते आणि ग्रामीण भागातील ५०% लोक व शहरांतील ३०% लोक कच्च्या घरांत राहतात. लाखो लोक किरायाने राहतात. काही लोकांच्या उत्पन्नाच्या २०% उत्पन्न घरावर खर्च होते. काही शहरात गृहनिर्माण मंडळ, नगरविकास प्राधिकरण यांनी एल.आय.सी., हडकोच्या सहकार्यावर घरे बांधली आहेत; परंतु इंजिनिअर्सनी घरे बांधण्यासाठी चांगल्या प्रतीचा माल (सिमेंट, वाळू इ.) न वापरल्यामुळे घरे लवकरच गळू लागली आहेत. भिंतीत भेगा पडत आहेत. म्हणूनच वर्तमानकाळात शहरात रोटी व कपड्यानंतर घरांची समस्या उग्र रूप धारण करीत आहे.

#### २) जलपुरवठा व जलनि:सारण -

दुसरी नागरीकरणाची महत्त्वाची समस्या म्हणजे पाणी पुरवठा आणि जलनि:सारणाची समस्या होय. आज भारतातील एकही शहर आपल्या नगरीतील लोकांना २४ तास पाणीपुरवठा करू शकत नाही. २४ तास पाणी पुरवठा न केल्यामुळे पाणीपुरवठ्याच्या पाईपमध्ये रिक्त स्थान निर्माण होते. त्यामुळे पाणीपुरठ्याच्या पाईपचे जोड बाहेरची घाण खेचून घेतात. मद्रास, हैद्राबाद, उदयपूर, अजमेरसारख्या शहरांत एका तासापेक्षाही कमी वेळ पाणीपुरवठा केला जातो. काही लहान शहरांत पाणीपुरवठा केलाच जात नाही. तेथील लोकांना कूपनलिकेवर



अवलंबून राहावे लागते. दिल्लीतील पाणीपुरवठा वाढवायचा असेल तर १८० कि.मी.दूर रामगंगेस जावे लागते. तर बंगळूर शहरास ७०० मिटर अंतरावरून पाणीपुरवठा केला जातो.

भारतातील शहरात पाणीपुरवठ्याची जशी स्थिती दिसते त्याहून वाईट स्थिती जलनि:सारणाची आहे. भारतात असे एकही शहर नाही की ज्या ठिकाणी पूर्णरूपाने मलविसर्जनसाठी नाले आहेत. चंदिगडसारखे पूर्वनियोजित शहरसुद्धा या बाबतीत दावा करू शकत नाही. जलनि:सारणाची व्यवस्था नसल्यामुळे नगरात अनेक ठिकाणी पाण्याचे खड्डे दिसतात. अशा साचलेल्या घाण पाण्यामुळे त्या ठिकाणच्या लोकांचे आरोग्य धोक्यात येते. म्हणून पाणीपुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय जल धोरण व जलनि:सारणासाठी राष्ट्रीय आणि क्षेत्रीय जलनि:सारण धोरणाची आवश्यकता आहे.

#### ३) वाहतूक आणि रहदारी -

नागरीकरणाची तिसरी समस्या म्हणजे वाहतूक आणि रहदारीची समस्या होय. कारण भारतातील एकाही शहरात वाहतुकीची आणि रहदारीची स्थिती चांगली दिसून येत नाही. शहरात जास्तीत जास्त लोक प्रवासासाठी बसेस किंवा ॲटोचा वापर करतात. काही लोक रेल्वेनेही प्रवास करतात. मोटार सायकली, स्कूटर, कार आदी वाहनांची दिवसेंदिवस संख्या वाढत आहे. त्यामुळे रहदारीची समस्या बिकट बनत चालली आहे. शिवाय धूर आणि आवाज यामुळे हवा प्रदूषित होत आहे. मोठ्या शहरात बसेसची संख्या प्रवाश्यांच्या संख्येच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे प्रवास करणाऱ्यांना बसेससाठी एकेक तास प्रतीक्षा करावी लागते. म्हणून ऑफिससाठी दोन तास अगोदर घरातून बाहेर पडावे लागते आणि ऑफिस संपल्यानंतर घरी येण्यासाठी दोन तास उशीर होतो. या त्रासाचे मुख्य कारण म्हणजे आर्थिक स्थिती होय. कमी उत्पन्नामुळे कमी किराया असणाऱ्या ठिकाणी राहावे लागते. पर्यायाने असे ठिकाण ऑफिसजवळ असतेच असे नाही. तसेच जास्तीच्या बसेस सोडणे परिवहन मंडळास परवडणारे नसते. कारण अगोदरच बसेसचे तिकीट कमी आणि पुन्हा त्यात जादा बसेस सोडणे हे परिवहन मंडळास सोसवत नाही. म्हणून परिवहन मंडळ पर्याप्त बसेस चालवू शकत नाही.

#### ४) निर्व्यक्तीकरण -

नागरीकरणाची आणखी एक समस्या म्हणजे निर्व्यक्तीकरण होय. नगरातील व्यक्ती आपल्या शेजाऱ्याबाबत उदासीन असतात. दुसऱ्याच्या प्रकरणात त्यांची लक्ष देण्याची तयारी नसते म्हणूनच नगरात एखादा अपघात घडो अथवा एक दुसऱ्यास विनाकारण त्रास देवो किंवा त्याच्यावर हल्ला करो अथवा एखाद्याची हत्या होवो ते केवळ उभे राहूनच पाहत असतात.

#### ५) प्रदूषण -

नगरांची सतत वाढ होत असल्यामुळे झाडे तोडून घरे बांधणाऱ्यांच्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे शहरातील बहुतेक वस्ती उजाड झालेली पाहावयास मिळते. शिवाय शहरांतील विविध कारखाने आणि वाहतुकीची साधने यामुळे हवेचे प्रदूषण वाढले आहे. तसेच शहरांतील घाण पाणी, कारखान्यातील घाण जवळच्या नदीत सोडली जाते त्यामुळे

पाणीप्रदूषण वाढते. तसेच मनोरंजनाची विविध साधने, वाहनांचे हॉर्न यामुळे ध्वनि प्रदूषण होते. म्हणून अलीकडे प्रदूषणाची समस्या नगरांची गंभीर समस्या बनली आहे.

**६) विजेची टंचाई -**

नागरीकरणाच्या वाढीबरोबर नगरात विजेच्या वापरातसुद्धा वाढ झालेली आहे. तसेच दिवसेंदिवस कारखान्यांच्या संख्येतसुद्धा वाढ होत आहे. त्यामुळे नगरात विजेची टंचाई भासत आहे. देशातील अनेक राज्ये आवश्यकतेप्रमाणे वीज उत्पादन करण्याच्या तयारीत नाहीत. त्यामुळे शेजारच्या राज्यांवर अवलंबून राहावे लागत आहे. परंतु अशा दोन राज्यांत वीज-पुरवठ्यावरून मतभेद झाल्यास नगरातील लोकांवर विजेच्या संकटाची स्थिती निर्माण होते.

**७) बेकारी -**

दिवसागणिक ग्रामीण भागातून नगराकडे स्थलांतर करण्यांची संख्या वाढत आहे. परंतु अशा नगरात आलेल्या सर्व लोकांना तेथील कारखाने रोजगार उपलब्ध करून देतीलच असे नाही. कारण त्यांच्यापुढे सुद्धा काही मर्यादा आहेत. यातील अनेक कारखान्यात संगणकाचा वापर सुरू झाला आहे. म्हणून कारखान्यात काम मिळत नाही. हे लोक निराश होतात. आपली दुःखातून सुटका करण्यासाठी अनेक व्यसनांच्या आहारी जातात व यातूनच लोक गुन्हेगारी जगताकडे वळतात. म्हणून बेकारीसुद्धा नागरीकरणापुढील एक समस्या आहे.

**८) बाल अपराध -**

नगरात अनेक माता-पिता आपल्या मुलांचा नीट सांभाळ करू शकत नाहीत. ते मुलांना भीक मागण्यास सांगतात, हॉटेल्समध्ये काम करावयास लावतात. ह्याशिवाय अनेक सराईत प्रौढ गुन्हेगार आपल्या गुन्ह्यांत बालकांनाही समाविष्ट करून घेतात. त्यामुळे चोरी करणे, बनावट वस्तू करून विकणे, खोटे कागद पत्रे तयार करणे असे अवैध धंदे शहरात चालतात.

**९) जुगार, सट्टा इ. -**

नगरात पैशास अधिक महत्त्व दिले जाते. म्हणून अनेकजण योग्य मार्गाने पैसा मिळत नसेल तर वाम मार्गाने पैसा मिळविण्याचा प्रयत्न करतात. यातूनच हे लोक जुगार, सट्टा, मटका खेळत असतात व अवैध मार्गाने पैसा मिळवितात.

**नागरी समस्या सोडविण्याचे उपाय -**

**(Solutions for Urban Problems)**

नागरीकरणामुळे नगरात विविध प्रकारच्या समस्या पाहावयास मिळतात. जर आम्हाला या समस्या सोडवावयाच्या असतील तर त्यावर काही उपाय योजावे लागतील. या संबंधात पुढील उपाय सुचविले जाऊ शकतात.

**१) नगरांचा नियोजनबद्ध विकास आणि रोजगाराच्या साधनांत वाढ -**

नगरांत उत्पन्न होणाऱ्या समस्यांवरील महत्त्वाचा उपाय म्हणजे नगरांचा नियोजनबद्ध विकास होय. आजपर्यंत भारतातील नगरांचा नियोजनबद्ध विकास झालेला नाही. म्हणून



नगरात विविध समस्या निर्माण झालेल्या पाहावयास मिळतात. या समस्या जर कमवयाच्या असतील तर नगरांचा नियोजनबद्ध विकास करावयास पाहिजे. नगरांचा नियोजनबद्ध विकास करावयाचे ठरविले तर पुढील २० वर्षात नगरे संपूर्ण देशात मोठ्या संख्येने सुनियोजित व्यवहार्य नागरी केंद्रे बनतील.

आजपर्यंत सरकारने केवळ ग्रामीण भागात रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विविध योजना राबविल्या. त्यात आय.आर.डी.पी, एन.आर.ई.पी. आणि आर.एल.ई.जी.पी. या समावेश होतो. या योजनांचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील लोक आपल्याच गावात राहावेत असा आहे. पण कृषिक्षेत्रात एका मर्यादेपर्यंत रोजगार मिळतो. त्यापेक्षा अधिक रोजगार मिळणे शक्य नसते. म्हणून आता रोजगाराच्या अशा योजना ग्रामीण भागापेक्षा नागरी भागात सुरू करण्यावर जास्त भर द्यावा जेणे करून नागरी भागातील बेरोजगार लोकांना आपल्या उदरनिर्वाहासाठी काम मिळेल.

**२) नगरीय योजना सह क्षेत्रीय योजना -**

नगरीय योजना नगरातच केंद्रित होतात. आम्ही नेहमी नगरासंबंधीच विचार करीत असतो. परंतु संपूर्ण क्षेत्रासंबंधी कधीच विचार करीत नाही. पण नगरासंबंधी योजना तयार करणे म्हणजे तात्पुरता उपाय होय; परंतु क्षेत्रीय योजनाद्वारे अधिक स्थायी उपाय करता येऊ शकतो. उदा. नगरात गलिच्छ वस्त्यांत राहणाऱ्या लोकांना नगर विकास प्राधिकरणाद्वारे घरे उपलब्ध करून देण्याऐवजी क्षेत्रीय योजनेद्वारे प्रवाश्यांना ज्या ठिकाणी रोजगार उपलब्ध आहे अशा अन्य ठिकाणी पाठविल्यास नगर विकासाची गती थांबविता येते.

**३) मागास क्षेत्रात उद्योग निर्मितीस प्रोत्साहन -**

भूमी मूल्यनिर्धारण धोरणास पुन्हा नियोजित केले पाहिजे. कारण यामुळे उद्योग मागासक्षेत्रात सुरू करण्यास प्रोत्साहन मिळेल. तसेच अशा मागास क्षेत्रात उद्योग सुरू करणाऱ्या उद्योगपतींना कारखान्यासाठी काही विशेष सवलती दिल्या पाहिजेत की जेणे करून अनेक कारखानदार ग्रामीण क्षेत्रात आपले कारखाने सुरू करतील. यामुळे महानगरांचा व मोठ्या शहरांचा विकास थांबेल.

**४) खाजगी वाहतुकीस प्रोत्साहन -**

नगर परिवहनावर राज्य सरकारचा एकाधिकार असतो. त्याच्याद्वारेच नगर परिवहन चालविले जाते. परंतु हे कर्मचारी अतिशय कठोर ह्रदयाचे असतात. ते वेळोवेळी संपावर जातात त्यामुळे त्याचा परिवहनावर व प्रवाशांवर परिणाम होतो. म्हणून खाजगी परिवहनास प्रोत्साहन दिले पाहिजे. खाजगी वाहतूकदार थोडा जास्तीचा दर आकारतील परंतु प्रवाशांची गैरसोय होणार नाही.

**५) भाडे नियंत्रण कायद्यात संशोधन -**

सध्या अस्तित्वात असलेल्या भाडे नियंत्रण कायद्यात सुधारणा व्हावयास पाहिजे. नाही तर घरांची समस्या आणखी तीव्र बनण्याची शक्यता आहे. कारण कोणताही घरमालक

घेण खोल्यांच्या बरोबर एक लाख रुपये खर्च करणार नाही व ३०० रु किराया १० ते २० वर्षे देणार नाही. कारण सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार त्याला किरायाही वाढविता येत नाही व योग्य कारण असले तरी तो भाडेकरूस घर खाली करण्यास सांगूही शकत नाही. परंतु महाराष्ट्र सरकारने या कायद्यात दुरुस्ती केली असून आता हळूहळू घरे भाड्याने उपलब्ध होत आहेत.

६) व्यावहारिक गृहनिर्मिती धोरणाचा स्वीकार -

इ.स. १९८८ साली भारत सरकारने राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण बनविले होते की, त्या धोरणाचा उद्देश शतकाअखेर सर्वांना घरे उपलब्ध करून देणे हा होता. परंतु हे धोरण महत्त्वाकांक्षी आणि अव्यावहारिक वाटते. हे असे स्वप्न आहे की सन २००० पर्यंत पूर्ण होणे अशक्य आहे. सरकारी धोरण आणि योजना अधिक व्यावहारिक असावयास पाहिजे. याचा अर्थ राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण विवेकहीन आहे असे नाही. हे धोरण अतिशय व्यापक आहे. यात असा प्रयत्न केला गेला आहे की घरे बांधण्यासाठी सहज पैसा उपलब्ध होईल व घर बांधण्यासाठी लागणारे साहित्य योग्य दरात मिळेल. पण याचा फायदा गरिबांना किंवा ज्यांचे उत्पन्न कमी आहे त्यांना होत नाही. म्हणून कमी उत्पन्न असणाऱ्यांना घर बांधण्यासाठी प्रोत्साहन देणारे धोरण असावे. तसेच घर मालकांनी कर्मचाऱ्यांसाठी घरे बांधावीत म्हणून त्यांना प्रोत्साहन देणारे धोरण असावे. तसेच या धोरणातील १०० कोटी रुपयांचा निधी हा अतिशय कमी आहे. या निधीमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. म्हणून जोपर्यंत राष्ट्रीय गृहनिर्माण धोरण व्यावहारिक असणार नाही तोपर्यंत निर्धारित केलेले लक्ष्य पूर्ण होणार नाही.

७) नगरपालिकांनी आपली वित्तीय साधने वाढवावीत -

नगर परिषदा/महानगरपालिका आपल्या क्षेत्रातील लोकांवर विविध प्रकारच्या करांची आकारणी करतात. यांनी कर रूपाने प्राप्त केलेला पैसा रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी, नाल्यांच्या व्यवस्थेसाठी, वीज पुरवठ्यासाठी आणि पिण्याच्या पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी केला तर जनता वेळेवर कर देऊ शकते. खरे म्हणजे नगर परिषदा/महानगरपालिका आपल्या नगराच्या विकासासाठी जो खर्च करतात तो खर्च आपल्याच उत्पन्नातून करावयास पाहिजे. कारण राज्य सरकारकडून आर्थिक अनुदान प्राप्त करणे आता अवघड होत चालले आहे. म्हणून नगरपरिषदा/महानगरपालिकांनी संपत्ती, पाणी आणि विजेवरील करात सुधारणा करून पैसा एकत्रित केला पाहिजे आणि आवश्यक सुखसुविधा प्रदान करण्यासाठी अधिक पैसा प्रतिव्यक्ती प्रतिवर्ष उपलब्ध केला पाहिजे. तसेच नगरात एखादा नवीन उद्योग या व्यापार सुरू केला जात असेल तर त्यावर जास्त कर आकारला पाहिजे की ज्यामुळे नगरपरिषद/महानगरपालिकेस अतिरिक्त उत्पन्न प्राप्त होऊ शकेल.

८) संरचनात्मक विकेंद्रीकरण -

काही नवमतवादी विचारवंत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संरचनात्मक विकेंद्रीकरणाची कल्पना करतात. त्यांच्या मते काही शहरात नवीन वस्त्या निर्माण झाल्या



आहेत. अशा वस्त्यांसाठी एक सामुदायिक केंद्र स्थापन करावे. या केंद्रात काही नगरपरिषदेचे/महानगरपालिकेचे सभासद व काही त्या नवीन वस्तीतील जनतेतील सभासद असावेत. नवीन वस्तीतून करांच्या रूपाने मिळणारा जो पैसा आहे तो नगरपरिषदेस किंवा महानगरपालिकेस न देता सामुदायिक केंद्रांकडे जमा करावा आणि सामुदायिक केंद्रांनी हा पैसा या नवीन वस्तीतील रस्त्यांसाठी, प्रकाश व्यवस्थेसाठी, पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी खर्च करावा. कारण यामुळे पैशाचा उपयोग योग्य कामासाठी केला जाऊ शकतो.

नागरीकरणाच्या समस्या दूर करण्यासाठी वरील उपाय सुचविले असले तरीही जोपर्यंत नागरी योजनांत सुधारणा होत नाहीत आणि त्यावर मौलिक उपाय केले जात नाहीत तोपर्यंत नागरी समस्या नष्ट होणार नाहीत. यासाठी नगरातील लोकांनी राजकीय दृष्ट्या सक्रिय व्हावयास पाहिजे. नगरातील विद्यमान आर्थिक व सामाजिक व्यवस्थेत परिवर्तन आणण्यासाठी संघटित व्हावे लागेल व वेळप्रसंगी आंदोलनही करावे लागेल.

⊛⊛⊛